# लिलाव विक्रीची सूचना

जुने व निकामी झालेल्या जडसंग्रह वस्तूंची लिलावाने विक्री करावयाची असून त्याची पुस्तकी एकूण मुल्य रु. 1678000/- इतके आहे. त्याचे विवरणपत्र सोबत जोडण्यात आले आहे. सदर निकामी वस्तूंसाठी दर हे एकदम द्यावयाचे आहेत. जास्तीत जास्त लिलावाचा दर एकदम द्यावयाचे आहेत. जास्तीत जास्त लिलावाचा दर देणाऱ्यास सामान देण्यात येतील. ज्या व्यक्तींचे /संस्थेचे दर स्वीकारण्यात येवून मंजूर केले जातील, त्यातील त्यांचे दर मंजूर केल्यानंतर लिलावाची रक्कम आगाऊ रोख स्वरुपात तीन दिवसाच्या आत भरुन निकामी सामान घेऊन जाणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांचे दर रद्द करुन निकामी सामानाची विक्री अन्य संस्थेस / व्यक्तीस करण्याचे अधिकार हे कार्यालय राखून ठेवीत आहे. तसेच सदर संस्थेची / व्यक्तीची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

कोणतेही दर मंजूर वा रद्द करणे तसेच लिलावाची कार्यवाही कोणत्याही स्तरांवर थांबविणे हे कार्यालयाचे हक्क अबाधित राहतील तसेच याबाबत कोणतीही कारणीमांसा केली जाणार नाही.

ज्यांना लिलावाच्या अटी व शर्ती मंजूर असतील अशा व्यक्तींनी / संस्थांनी लिलावात सहभागी व्हावे. लिलाव शुक्रवार दिनांक 01/08/2025 रोजी सकाळी ठिक 10.00 वा. कॉलेज कार्यालयात होईल. सहभागी व्यक्तींनी / संस्थांनी विहित वेळेत उपस्थित रहावे.

पुढे नमुद केलेल्या विहित अटी आणि शर्ती यांचे अधिन राहून लिलावास मंजूरी देण्यात येईल.

## अटी व शर्ती

1. ज्या व्यक्तीस / संस्थेस लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी रु. 1000/- रक्कमेचा धनाकर्ष प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण – इस्लामपूर यांच्या नावे लिलावाच्या दिवशी कार्यालयात जमा करावा. अयशस्वी बोलीदारांचे धनाकर्ष त्याच दिवशी लिलाव संपल्यानंतर परत करण्यात येतील.
2. ज्या व्यक्तीचा / संस्थेचा दर मंजूर करण्यात येईल. अशा व्यक्तींनी / संस्थांनी निकामी सामान कार्यालयाच्या आवारात व आवारातून बाहेर नेताना वाहतूकीचा , हमालीचा व सामान हाताळणीचा खर्च स्वत: सोसावयाचा आहे.
3. निकामी सामान कार्यालयीन इमारत/ आवारातून बाहेर नेताना कार्यालयीन कामकाजात कोणता अडथळा येणारा नाही याची दक्षता घ्यावी.
4. निकामी सामान कार्यालयीन इमारत/आवारातून बाहेर नेताना कार्यालयीन वस्तूंची मोडतोड झाल्यास त्याची नुकसान भरपाई रोखीच्या स्वरुपात त्याच ठिकाणी वसूल करण्यात येईल.
5. निकामी सामान जेथे आहे, ज्या अवस्थेत आहे. त्या अवस्थेत आहे, त्या अवस्थेत घ्यावे लागेल.
6. निकामी सामान कार्यालयीन आवाराच्या बाहेर त्वरीत नेणे बंधनकारक राहिल.
7. जुने निकामी सामान पहावयाचे झाल्यास दि. 29/07/2025 ते 31/07/2025 या कालावधीत कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी 10.00 ते 3.00 या वेळेत पाहता येईल.
8. ज्या व्यक्तींच्या / संस्थेच्या लिलावाची बोली सर्वात जास्त असेल अशा पक्षकाराने सर्वात जास्त रक्कम बोली केलेल्या एकूण रकमेच्या 25% रक्कम लिलाव संपल्यानंतर त्याच दिवशी रोखीने किंवा धनाकर्ष स्वरुपात कार्यालयात भरणा करणे बंधनकारक राहिल.

COLLEGE, URUN-ISLAMPUR ESTD. 1961